**किरकोळ अर्ज क्र.४५**/२०२५

**मुळ क्लेम अर्ज क्र.७३८/२०१५**

**मोटार अपघात नुकसानभरपाई दावा न्यायिक चौकशीची आवश्यकता नसलेले किरकोळ अर्ज क्र. ४५/२०२५ मधील निशाणी क्र.१ वर खालील आदेश :—**

सदर प्रकरणातील ऑनलाईन अर्ज,त्यासोबतचे प्रतिज्ञापत्र वाचले. तसेच अर्जदारांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जासोबत आधार कार्ड,एम.ए.सी.पी.क्र.७३८/२०१५ मधील निकालाची प्रत, मा.उच्च न्यायालयाचे प्रथम अपील स्टॅम्प क्र.९९०५८/२०२० त्यामधील इंटेरिम अर्ज क्र.१७६०३/२०२२ मधील दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या आदेशाची प्रत, अर्जदार क्र.२ व ३ यांचा जन्मदाखला व नाझर अहवाल जोडलेले आहेत.

सदर अर्ज अर्जदार यांनी मा.उच्च न्यायालयाच्या दि.२९.०८.२०२२ रोजीच्या आदेशानुसार त्यांची रक्कम मिळण्यसाठी केलेला आहे. मा.उच्च न्यायालय यांनी प्रथम अपील स्टॅम्प क्र.९९०५८/२०२० त्यामधील इंटेरिम अर्ज क्र.१७६०३/२०२२ मधील दिनांक २९/०८/२०२२ रोजीच्या आदेशाप्रमाणे अर्जदार यांना जाबदेणार विमा कंपनी यांनी भरलेल्या एकुण रक्कमेतून २५ टक्के रक्कम हुकूमनाम्यामधील त्यांच्या हिश्यानुसार आजपर्यतच्या व्याजासह, हमीपत्र घेवून देण्याचा आदेश केला आहे. मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार अर्जदार यांनी हमीपत्र देखिल दाखल केलेले आहे.

तसेच एम.ए.सी.पी.क्र.७३८/२०१५ मधील हुकूमनाम्याप्रमाणे अर्जदार क्र.२ व ३ यांच्या हिश्याची रक्कम ते सज्ञान होईपर्यत मुदतठेवी मध्ये ठेवण्यात आली आहे. अर्जदार यांचे जन्म दाखल पाहिले असता त्यावर त्यांची अनुक्रमे जन्मतारीख दि.३१/०७/२००४ व दि. ११/०३/२००६ अशी नमूद केलेली आहे. अर्जदार आजरोजी सज्ञान झाल्याचे दिसून येत आहेत. त्याकरीता अर्जदार यांनी दाखल केलेली कागदपत्रे पाहता त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करीता पुढील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आदेश**

१. सदर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२. सी.क्र.३८६ दि.१३/१०/२०२२ प्रमाणे मुदतठेवी मध्ये असलेली रक्कम रुपये २२,०४,२८३/— पैकी २५ टक्के रक्कम ( रक्कम रुपये ५,५१,०७०/— ) खालील प्रमाणे अदा करण्यात यावेत.**

**अ.** अर्जदार क्र.१ श्री.असद अन्वर शेख यांना रक्कम रुपये २,५१,०७०/— हे आजपर्यतच्या व्याजसह अदा करण्यात यावेत.

**ब.** अर्जदार क्र.२ श्री. अब्दुल्लाह असद शेख व अर्जदार क्र.३ श्री. युनुस असद शेख यांना प्रत्येकी रक्कम रुपये १,५०,०००/— हे आजपर्यतच्या व्याजसह अदा करण्यात यावेत.

३. तसेच उर्वरीत रक्कम त्यावरील व्याज पुन्हा या न्यायाधिकरणाच्या नावे सदर अपीलाचा निकाल होईपर्यत बॅकेंत मुदतठेवी मध्ये ठेवण्यात यावेत.

४. तसे सबंधित बॅकेला कळविण्यात यावे.

BHUSHAN PRAKASH KSHIRSAGAR

Digitally signed by BHUSHAN PRAKASH KSHIRSAGAR
Date: 2025.03.19 11:03:46 +0530

**दिनांक —१७/०३/२०२५**

**(बी. पी. क्षीरसागर)**
**सदस्य**
**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,पुणे**